**कृपया प्रसिद्धीसाठी** **10 एप्रिल 2011**

## चर्चगेट - डहाणू रेल्वे सुरु होण्यात अजूनही अनिश्चितता
## रेल्वे महाव्यवस्थापकांची कबुली

**मुंबई, रविवार :**विरार - डहाणू रोड रेल्वे मार्ग रुंदीकरणाचे काम मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाने (एमआरव्हीसी) पूर्ण केले असून चर्चगेट - डहाणू रोड लोकल सेवा नवे ईएमयु डबे उपलब्ध झाल्यानंतर सुरु करण्यात येईल. ही सेवा सुरु करण्यासाठी पश्चिम रेल्वे प्राथमिकता देऊन काम करेल. परंतु तरीही ती सेवा केव्हा सुरु होईल याचा निश्चित कालावधी आजच सांगता येणार नाही. अशी माहिती पश्चिम रेल्वेचे प्रभारी महाव्यवस्थापक श्री. कुलभूषण यांनी शुक्रवारी माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांना दिली. 226 कोटी रुपयांचे विरार - कारशेडचे काम जून 2011 मध्ये पूर्ण होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

श्री. राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळात ठाणे जिल्हा पश्चिम पट्टीतील आमदारद्वय श्री. चिंतामण वनगा आणि श्री. विष्णू सावरा, नगरसेवक श्री. राजन नाईक (नालासोपारा), सर्वश्री केदारनाथ म्हात्रे (नायगाव), शेखर धुरी (वसई रोड), हंसराज पाटील (भाईंदर), मिठालाल जैन (पालघर) आणि डहाणूचे भाऊराव देशमुख व मनमोहन सचदेव यांचा समोवश होता. चर्चेच्या वेळी पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे यांचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

चर्चेविषयी अधिक माहिती सांगताना श्री. राम नाईक म्हणाले," वाजपेयी सरकारच्या वेळी मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प - एक जेव्हा मंजूर केला त्यावेळी संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. 3,125 कोटी होता व तो 2007 मध्ये पूर्ण व्हावयाचा होता. परंतु डॉ. मनमोहन सिंह यांच्या काळात सुरुवातीला श्री. लालूप्रसाद यादव आणि नंतर कु. ममता बॅनर्जी यांनी मुंबईकडे दुर्लक्ष केल्यामुळे आता त्याचा सुधारित खर्च रु. 4,501 कोटींवर पोचला असून अजूनही त्यातील महत्त्वाची काही कामे पूर्ण व्हावयाची आहेत. यातील विरार कारशेड आणि यार्डचा सुरुवातीचा खर्च होता रु. 73 कोटी, तो आता वाढून रु. 226 कोटी झाला असून हे काम जून 2011 मध्ये पूर्ण होईल तर विरार - डहाणू रोड मार्ग रुंदीकरणाचा सुरुवातीचा खर्च होता रु. 29 कोटी तो आता रु. 50 कोटी झाला आहे. प्रकल्पाचा वाढलेला खर्च आणि तो पूर्ण करण्यात होत असलेला विलंब लक्षात घेऊन उपनगरी प्रवाशांचा संयम आता संपत आला असून चर्चगेट - डहाणू लोकल सेवा सुरु करण्यास अधिक विलंब झाल्यास उग्र आंदोलन केव्हाही सुरु होऊ शकते याची जाणीव शिष्टमंडळाने रेल्वे व्यवस्थापनाला करुन दिली".

जोगेश्वरी आणि गोरेगावच्या दरम्यान व्हावयाच्या ओशीवरा स्थानकाबद्दलही चर्चा झाली. सुरुवातीला रु. 6 कोटी खर्चात होणा-या या स्थानकाचा सुधारीत खर्च पाचपटी पेक्षा जास्त म्हणजे रु. 32 कोटी झाला आहे, तसेच काम पूर्ण करण्याचे निर्धारित लक्ष्य मार्च 2008 होते ते आता केव्हा पूर्ण होईल हे सांगण्याच्या स्थितीत रेल्वे प्रशासन नाही. या परिस्थितीबद्दल शिष्टमंडळाने तीव्र नाराजी व्यक्त केल्यानंतर या प्रकल्पाचा पुन्हा आढावा घेऊन चर्चा करण्याचे आश्वासन रेल्वे महाव्यवस्थापकांनी दिले.

2011 - 2012 च्या रेल्वे अर्थसंकल्पात पश्चिम व मध्य रेल्वेच्या उपनगरी क्षेत्रात जे प्रकल्प दाखविण्यात आले आहेत त्यासाठी किती रक्कम मंजूर झाली आहे याची सविस्तर माहिती अजूनही उपलब्ध झालेली नाही. ती सात दिवसांच्या आत देण्याचे आश्वासनही रेल्वे महाव्यवस्थापकांनी श्री. राम नाईक यांना दिले.

**(कार्यालय सचिव)**